### शालेय शिक्षण

■ १०९ केंद्रीय विद्यालय सुरू करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यापैकी ५९ केंद्रीय विद्यालयांचे काम सुरू झाले असून ५० विद्यालयांना मंजुरी मिळाली आहे.
■ ६२ नवीन जवाहर नवोदय विद्यालयांना मंजुरी.
■ आगामी शैक्षणिक वर्षात दहावी बोर्ड परीक्षा बंधनकारक करण्याचा निर्णय.
■ आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना नापास न करण्याच्या निर्णयावर अनेक वाद झाले. केंद्र सरकारने केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाची बैठक घेऊन याबाबतचा निर्णय राज्यांवर सोपवला आहे. याबाबतचे विधेयक लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर सादर केले जाईल. यानुसार पाचवी आणि आठवीत विद्यार्थ्यांना नापास करायच्या आदी जूनमध्ये त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी देण्यात येईल.
■ आरटीईमध्ये काही बदल केले आहेत. शाळांना विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी काही निकष ठरवण्याचे निर्देश.

### उच्चशिक्षण

■ सात नवीन आयआयएमना मंजुरी. यामध्ये नागपूरचाही समावेश
■ ६ आयआयटी संस्थांना मंजुरी
■ बिहारमध्ये मोतीहारी येथे केंद्रीय विद्यापीठाला मंजुरी
■ अतिरिक्त उच्च शिक्षण वित्तसंस्थेद्वारे २० हजार कोटींच्या निधीची तरतूद
■ जुलैपासून ३८ केंद्रीय विद्यापीठांत वायफाय सुविधा
■ 'नीट'प्रमाणे इंजिनीअरिंगसाठी कॉमन इण्टरन्स टेस्ट घेण्याचा निर्णय. काही राज्यांचा विरोध असल्याने अंमलबजावणी लांबवणीवर.
■ माजी मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी दिल्ली विद्यापीठात सुरू केलेला चार वर्षीय विद्यापीठ अभ्यासक्रम (एफवाययूपी) रद्द. अभाविप, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विद्यार्थी संघटनेचा या अभ्यासक्रमाला होता कडवा विरोध.

### शिक्षकांसाठी...

■ शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी बीएड कॉलेजच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित केले आहे. २०१७-१८ या वर्षात कोणत्याही बीएड कॉलेजला परवनगी न देण्याचा निर्णय.
■ शिक्षक कॉलेजना गुणवत्तेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश. सात हजार कॉलेजकडून प्रतिज्ञापत्र सादर. प्रतिज्ञापत्र सादर न केलेल्या कॉलेजांना नोटिसा.
■ पहिल्या अर्थसंकल्पात शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी पाच वर्षांकरिता १८० कोटींची तरतूद. शिक्षकांसाठी महत्त्वाकांक्षी पंडित मदन मालवीय राष्ट्रीय मिशन. यासाठी ९०० रुपयांची तरतूद.

**“मनुष्यबळ विकास मंत्रालयाने उच्चशिक्षण संस्थांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने अनेक प्रशंसनीय पावले उचलली आहेत. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानासाठी उत्तम आर्थिक तरतूद, विद्यापीठांची गुणवत्ता उंचावण्यासाठी सर्वोत्कृष्ट शिक्षणप्रणालींचा तुलनात्मक अभ्यास आणि अंतर्भाव, 'श्रेणीबद्ध स्वायत्तता' देण्याबद्दलचा मसुदा अशा कालसुसंगत पावलांचा समावेश आहे. या सर्व उपक्रमांमुळे शिक्षणाचा राष्ट्रीय स्तर उंचावत राहील.**

- प्रो. डॉ. उदय साळुंखे, समूह संचालक, वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रिसर्च







शिक्षण

**स्मृती इराणी मनुष्यबळ विकासमंत्री असताना अनेक वादग्रस्त निर्णय घेण्यात आले. टीकेचा सामना करावा लागल्यानंतर यातील काही निर्णय मागे घेण्यात आले. त्यानंतर या मंत्रालयाची धुरा हाती घेतलेल्या प्रकाश जावडेकर यांनी शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने काही निर्णय घेतले आणि वादांवर फुंकर घालण्याचा प्रयत्न केला.**

# वादांवर योजनांची फुंकर




### काही वादग्रस्त निर्णय

■ इराणी यांच्या आदेशावरून यूजीसीने चॉइस बेस क्रेडिट सिस्टिम (सीबीसीएस) सुरू केली. ही सिस्टिम वरकरणी चांगली वाटत असली तरी यामुळे उच्चशिक्षणाचे खासगीकरण होण्याची भीती तज्ज्ञ व्यक्त करतात.
■ आयआयटीची वार्षिक फी ९० हजारांहून २ लाखांपर्यंत वाढवण्यात आली. त्याचबरोबर अनेक केंद्रीय विद्यापीठांच्या फीमध्ये वाढ करण्यात आली.
■ आयआयटीमध्ये संस्कृत सुरू करण्याची इराणी यांची घोषणा. शैक्षणिक संस्थांमध्ये संस्कृतचा प्रचार करण्यासाठी समिती स्थापन.
■ ऑक्टोबर २०१४मध्ये केंद्रीय विद्यालयात तिसरी भाषा म्हणून जर्मनऐवजी संस्कृत सुरू करण्याचा निर्णय. हा मुद्दा जर्मन चॅन्सलर अँजेला मार्केल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर उपस्थित केला.
■ इराणी यांचा हस्तक्षेप होत असल्याचा आरोप करत आयआयटी दिल्ली डायरेक्टर आर. के. शेवगावकर आणि आयआयटी मुंबई बोर्डाचे अध्यक्ष शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
■ डिसेंबर २०१४मध्ये नवोदय विद्यालय समितीकडून सर्व शाळांना २५ डिसेंबरला 'सुप्रशासन दिन' पाळण्याची सूचना. यादिवशी सर्व विद्यार्थ्यांनी शाळेत हजर राहण्याचे आदेश.

### विद्यार्थी आंदोलने



■ हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील रोहित वेमुला या दलित विद्यार्थ्याने आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून केंद्रीय कामगारमंत्री बंडारू दत्तात्रेय, भाजप आमदार रामचंद्र राव, विद्यापीठाचे कुलगुरू आप्पा राव आणि दोन विद्यार्थ्यांविरोधात 'एफआरआय' दाखल. विद्यार्थी संघटनेच्या नेत्याला मारहाण केल्याच्या आरोपावरून रोहितला केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने विद्यापीठातून निलंबित केले होते. विद्यार्थी संघटना एनएसयूआय तसेच डाव्या व आम आदमी पक्षाच्या विद्यार्थी संघटनांनी तीव्र निदर्शने केली.



■ जेएनयूच्या आवारात काही विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात संसदेवरील हल्ल्याचा सूत्रधार अफजल गुरूला देण्यात आलेल्या फाशीचा निषेध करण्यात आला व अफजलच्या बाजूने घोषणा देण्यात आल्या. याप्रकरणी विद्यापीठातील डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थी संघटनेचा नेता कन्हैया याला अटक करण्यात आल्याने वाद चिघळला.

■ जून २०१५मध्ये एफटीआयआयच्या अध्यक्षपदी गजेंद्र चौहान यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. चौहान आणि एफटीआयआय सोसायटीवरील संघ परिवाराशी संबंधित असलेल्या चार व्यक्तींना हटवण्याची मागणी करत विद्यार्थ्यांनी संप पुकारला. तब्बल १३९ दिवस चाललेला हा संप ऑक्टोबर २०१५मध्ये मागे घेण्यात आला.



### प्रलंबित प्रश्न

■ स्मृती इराणी मनुष्यबळ विकासमंत्री असताना सरकारने नवीन शिक्षण धोरणाबाबत प्रस्ताव तयार केला होता. सरकारने याबाबत नवीन समितीही स्थापन करण्याची घोषणा केली होती. परंतु पुढे काहीच कार्यवाही झाली नाही.
■ आयआयटीच्या प्रवेश परीक्षेत बारावीचे महत्त्व राहणार की नाही, याबाबतही सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

### अभ्यासक्रम बदल

■ एनसीईआरटीने सर्व पुस्तकांचा फेरआढावा घेण्याचे ठरवले आहे. ही पुस्तके अद्ययावत करण्याची गरज कौन्सिल डायरेक्टर ऋषिकेश सेनापती यांनी व्यक्त केली.
■ २०१७-१८ या वर्षापासून सीबीएसई शाळांना एनसीईआरटी पाठ्यपुस्तके वापरणे बंधनकारक
■ सुप्रसिद्ध हलदीघाटी युद्धात महाराणा प्रताप अकबराच्या सैन्याकडून पराभूत होऊनही ते विजयी झाल्याचा नवा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा राजस्थान विद्यापीठ विचार करत आहे.
■ केंद्रीय विद्यालये आणि सीबीएसई शाळांमध्ये दहावीपर्यंत हिंदी अनिवार्य करण्याचा संसदीय समितीचा प्रस्ताव.

संकलन: **ऋतुजा सावंत**

## ईव्हीएम सुरक्षेचे आज प्रात्यक्षिक

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** नवी दिल्ली



लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरल्या जाणाऱ्या ईलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्समध्ये कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार करता येत नाही, हे सिद्ध करून ईव्हीएमभोवती निर्माण झालेल्या संशयाचे वलय संपुष्टात आणण्यासाठी निवडणूक आयोगाने आज, शनिवारी दिल्लीत प्रात्यक्षिकाचे आयोजन केले आहे. राजकीय पक्षांना ईव्हीएम हॅक करून दाखविण्याचे आव्हान देण्याच्या मुहूर्ताचीही यावेळी घोषणा केली जाऊ शकते.

नुकत्याच पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका तसेच मुंबईसह महाराष्ट्र आणि दिल्लीतील महापालिका निवडणुकांमध्ये भाजपने ईव्हीएमचा गैरवापर करून विजय मिळविल्याचा आरोप काँग्रेस, आप आणि बसपसह विरोधी पक्ष करीत आहेत. ईव्हीएम हॅक केल्याने कुठल्याही पक्षाला दिलेले मत भाजपलाच असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. दिल्ली विधानसभेत 'आप'चे आमदार सौरभ भारद्वाज यांनी ईव्हीएम हॅकिंगचे प्रात्यक्षिक सादर केल्यामुळे देशभरात ईव्हीएमविषयीच्या संशयात आणखीच भर पडली.

पण ईव्हीएमच्या माध्यमातून होणारी मतदान प्रक्रिया पूर्णत: सुरक्षित असून त्यात कुठलीही छेडछाड करता येत नाही, असा आयोगाचा दावा आहे. त्यासाठी आयोगाने विज्ञान भवनात शनिवारी प्रात्यक्षिकाचे आयोजन केले असून दु. तीन वाजतापासून त्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल. ईव्हीएमला जोडलेल्या व्हीव्हीपॅटसह २०१९ साली लोकसभा निवडणुका घेता याव्यात, म्हणून अलीकडेच ३१९१ कोटी रुपयांच्या व्हीव्हीपॅट खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

ADVERTORIAL

## 'दहावीनंतरचे करिअर्स'वर मार्गदर्शन

दहावीची परीक्षा ही कुठल्याही विद्यार्थ्याच्या करिअरमधली अत्यंत महत्त्वाची परीक्षा मानली जाते. कारण या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांच्या करिअरला खऱ्या अर्थाने आकार येण्यास सुरुवात होते. जागतिकीकरण, कम्प्युटरायझेशनमुळे सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढते आहे. त्यामुळे करिअरची योग्य निवड हा कळीचा मुद्दा बनला आहे. दहावीनंतर काय करायचे, करिअरसाठी कोणती ज्ञानशाखा निवडावी, या ज्ञानशाखांसाठीच्या प्रवेश परीक्षांची तयारी कशी करावी, दहावीनंतरचे कॉमर्स आणि सायन्सचे पर्याय कोणते याबद्दलच्या अनेक शंका विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पालकांनाही असतात. या सर्व प्रश्न आणि शंकांचे निरसन करण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स प्लॅनेट कॅम्पस' आणि 'आयडिअल एज्युकेशन' यांच्यातर्फे रविवार २१ जून रोजी 'दहावीनंतर पुढे काय?' या विशेष मुंबईत विविध ठिकाणी सेमिनार्सचे आयोजन केले आहे.

**बोरिवली : कॉमर्स:** स.१० ते ११, **सायन्स:** स.११ ते दु.१२.३० : तळ व पहिला मजला, भक्ति अपार्टमेण्ट, जांभळी गल्ली, जैन मंदिरासमोर, एस.व्ही.रोड, बोरिवली(प.)

**विरार: कॉमर्स:** स.१० ते ११, **सायन्स:** स.११ ते दु.१२.३० : जी विंग, पहिला मजला, विष्णू प्रतिभा, रेल्वे स्टेशन आणि एसटी स्टॅण्डजवळ, विरार (प.). संपर्क: ८४२२८१८१००

**गोरेगाव: कॉमर्स:** संध्या. ४ ते ५, **सायन्स:** संध्या. ५ ते ६.३० : उमा-स्मृती, पहिला आणि दुसरा मजला, फिल्मीस्तानजवळ, एस.व्ही रोड, गोरेगाव (प.). संपर्क: २८७८७५५३, ८४२२८१८११०

**विलेपार्ले : कॉमर्स:** संध्या. ४ ते ५, **सायन्स:** संध्या. ५ ते ६.३०: २०५-२०६ श्यामकमल सोसायटी, दुसरा मजला, तेजपाल रोड, विलेपार्ले स्टेशनसमोर, विलेपार्ले(पू)

**अधिक माहितीसाठी संपर्क-** ७६६६६५७९८८ किंवा http://www.idealclasses.com/seminar वर जाऊन नोंदणी करा.

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी
प्रस्तुत

## दहावीनंतरच्या करिअरबाबत मार्गदर्शन

मोफत सेमिनार

### सेमिनारमध्ये चर्चिले जाणारे मुद्दे

२१ मे, २०१७

- दहावीनंतर पुढे काय?
- ज्ञानशाखेची निवड कशी कराल?
- प्रवेश परीक्षांची तयारी कशी करावी?
- दहावीनंतर कॉमर्स आणि सायन्सचे काय पर्याय आहेत?

| कॉमर्स | सायन्स | शाखा |
|---|---|---|
| सकाळी १० ते ११ | सकाळी ११ ते दु. १२.३० | तळमजला आणि पहिला मजला, भक्ती अपार्टमेण्ट, जांभळी गल्ली, जैन मंदिरासमोर, एस.व्ही. रोड, बोरिवली (प.). |
| सकाळी १० ते ११ | सकाळी ११ ते दु. १२.३० | 'जी' विंग, विष्णूप्रतिभा, रेल्वे स्टेशन आणि एस.टी. स्टॅण्डजवळ, विरार (प.). |
| संध्या.४ ते ५ | संध्या.५ ते ६.३० | उमा-स्मृती, पहिला आणि दुसरा मजला, फिल्मिस्तानजवळ, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प.). |
| संध्या.४ ते ५ | संध्या.५ ते ६.३० | २०५, २०६ श्यामकमल सोसायटी, दुसरा मजला, तेजपाल रोड, विलेपार्ले स्टेशनसमोर, विलेपार्ले (पू.). |

नोंदणीसाठी लॉग इन करा: http://www.idealclasses.com/seminar
अधिक माहितीसाठी संपर्क- ७६६६६५७९८८ किंवा www.idealclasses.com

## व्हेरिकोज व्हेन्स?



तुमच्या पायाचे आरोग्य व्हार्कोने सुधारा

व्हेरिकोज व्हेन्सची लक्षणं:
- सूज किंवा वरवर ताण
- जड, दमलेले, खाजणारे किंवा अस्वस्थ पाय
- त्वचा बदलते जशी की पायावरची त्वचा

हे टाळा-
एनआयएचसी इंग्लंडच्या सल्ल्यानुसार स्टॉकिंग किंवा शस्त्रक्रिया

सर्वोत्तम परिणामांकरता- दररोज ३ वेळा, सतत ६ आठवडे लावा, व्हार्कोची ८-९ युनिट्स वापरा

व्हार्को हे टॉपिकल फायटो तेल आहे ज्याच्या औषधी गुणांचं आणि टॉक्सिक्स यांचं मूल्यांकन केलेलं आहे.




व्हार्को तेल
लेग केअर
टॉपिकल फायटो ऑइल
Available online at
Flipkart | snapdeal
www.varcophyto.com

* उत्पादनाची माहिती, तेल लावायची पद्धत आणि सीओडी सुविधेसाठी कॉल करा: +91- 9594208237 | For more information and store locator visit: www.varcophyto.com | For distribution enquiry call: +91-9874366800
Authorized Superstockist: STL Pharmacy - +91 23736400 / +91 9220044777.
Available at Noble Plus: 26701100, Noble Chemist: 7208066446, Wellness forever - 43541771
Available at all leading chemist/ayurvedic stores

## शिल्पा शेट्टी न्यायालयात हजर

**म. टा. प्रतिनिधी,** ठाणे

फसवणुकीचा गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी चित्रपट अभिनेत्री शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा शुक्रवारी ठाणे जिल्हा सत्र न्यायालयात हजर झाले होते. या प्रकरणी ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाने दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला असून याबाबत दोघांच्या अटकपूर्व जामिनाबाबत अंतिम सुनावणी शनिवारी होणार आहे.

ऑनलाइन विक्री केलेल्या मालाचे २४ लाख रुपये भिवंडी एमआयडीसी परिसरातील व्यापारी रवी मोहनलाल भालोटिया यांच्या भालोटिया एक्स्पोर्ट कंपनीला न दिल्याप्रकरणी अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांच्यासह कंपनीच्या पाच संचालकांवर काही दिवसांपूर्वी कोनगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. भालोटिया यांनी त्यांचे पैसे


स्वप्निल शेजवळ

परत मिळावेत, यासाठी शेट्टी आणि कुंद्रा यांच्या कंपनीशी संपर्क साधला. मात्र त्यानंतरही पैसे न मिळाल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली होती. त्यामुळे या प्रकरणात अटकपूर्व जामिनासाठी अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांनी ठाणे जिल्हा सत्र न्यायालयात हजेरी लावली. या प्रकरणी न्यायाधीश संगीता खलिपे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली असता, न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. त्यामुळे शनिवारी या दोघांना अटकपूर्व जामीन मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

दरम्यान, राज कुंद्रा यांनी न्यायालयात तक्रारदाराला १०० कोटी तयार ठेव म्हणून धमकावल्याची बाब तक्रारदाराच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी न्यायालयाने शनिवारी लेखी हमीपत्र आणि माफीनामा सादर करत कुंद्रा यांना हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

## PIDILITE INDUSTRIES LIMITED

FEVICOL | DR. FIXIT WATERPROOFING EXPERT | ONE DROP INSTANT ADHESIVE Fevi kwik | M-seal | fevi stik super

### EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31.03.2017

(₹ In crores)

| Sr. No. | Particulars | Standalone Quarter ended 31.03.2017 (Audited) | Standalone Quarter ended 31.03.2016 (Audited) | Standalone Year ended 31.03.2017 (Audited) | Standalone Year ended 31.03.2016 (Audited) | Consolidated Quarter ended 31.03.2017 (Audited) | Consolidated Quarter ended 31.03.2016 (Audited) | Consolidated Year ended 31.03.2017 (Audited) | Consolidated Year ended 31.03.2016 (Audited) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 1,267.11 | 1,184.51 | 5,408.75 | 5,133.68 | 1,432.88 | 1,340.48 | 6,174.56 | 5,779.43 |
| 2 | Net Profit for the period (before tax and Exceptional items) | 258.33 | 223.66 | 1,239.06 | 1,096.50 | 254.36 | 235.60 | 1,248.27 | 1,140.77 |
| 3 | Net Profit for the period before tax (after Exceptional items) | 163.99 | 196.66 | 1,144.72 | 1,069.50 | 254.36 | 235.60 | 1,248.27 | 1,140.77 |
| 4 | Net Profit for the period after tax (after Exceptional items) | 71.01 | 129.05 | 773.79 | 746.72 | 157.23 | 169.08 | 863.22 | 807.23 |
| 5 | Total Comprehensive Income [Comprising Profit/(Loss) after tax and Other Comprehensive Income after tax] | 71.69 | 129.04 | 771.81 | 746.50 | 157.72 | 169.10 | 861.05 | 807.04 |
| 6 | Equity Share Capital | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 |
| 7 | Reserves excluding Revaluation Reserves as at Balance Sheet date | | | 3,348.08 | 2,599.32 | | | 3,419.64 | 2,586.72 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 1/- each) | | | | | | | | |
| | Basic: | @ 1.39 | @ 2.52 | 15.09 | 14.57 | @ 3.06 | @ 3.29 | 16.77 | 15.66 |
| | Diluted: | @ 1.38 | @ 2.52 | 15.09 | 14.56 | @ 3.06 | @ 3.29 | 16.77 | 15.65 |

@ For the period only and not annualised.

**Note:**

1. Standalone Results for the quarter and year is after providing for exceptional items aggregating to ₹ 94 crores related to impairment of Company's investment in subsidiaries. Net profit after tax and before exceptional items at ₹ 165 crores grew by 6% for the quarter and at ₹ 868 crores grew by 12% for the year.
2. The above is an extract of the detailed format of Quarter and Year ended Audited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarter and Year ended Audited Financial Results are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com and www.bseindia.com) and on company's website www.pidilite.com.

Place : Mumbai
Date : 18th May, 2017

Bharat Puri
Managing Director

Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No.: 91 22 2835 7000 Fax: 91 22 2835 6007 Email address: investor.relations@pidilite.co.in Website: www.pidilite.com CIN: L24100MH1969PLC014336